-: **प्रेस नोट** :-

अंमली पदार्थ विक्री करणा-या दोन सराईत महिलांना कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे मुंबई येथील पोलीसांनी कौशल्यपुर्णरित्या अटक केल्याबाबत .....

कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे मुंबई गुन्हा नोंद क्र. ६९१/२०२६ कलम-८(क),२१(ब), २९, एन्. डी.पी.एस्. ॲक्ट-१९८५ मधील पाहिजे आरोपी १)श्रीमती. रेहाना अब्दुल हमीद मुलानी उर्फ रॅलीअप्पा वय-६० वर्षे, रा.ठी. गल्ली नं ०३, संतोषनगर, झोपडपटटी दौलतनगर, बोरीवली पूर्व मुंबई २) श्रीमती. फरीदा मुलानी वय-३२ वर्षे, दोघेही रा.ठी. गल्ली नं ०३, संतोषनगर, झोपडपटटी दौलतनगर, बोरीवली पूर्व मुंबई या नमुद गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झाल्या होत्या त्यांना अटक करणे आवश्यक होते.

दिनांक ०२/११/२०२६ रोजी आज रोजी सदर गुन्हयांच्या अनुषंगाने रवाना झालेले सपोनि युवराज इनामदार, पोउनि बारगजे, मपोशि ०९२१३४/ दाते व पथक हे पोलीस ठाणेस परत येवुन निवेदन करतात, गु.र.क्र ६९१/२०२६, कलम ८(क),सह २१(ब), एन.डी.पी.एस कायदा १९८५ मधील पाहिजे आरोपी नामे ०१) श्रीमती. रेहाना अब्दुल हमीद मुलानी उर्फ रॅलीअप्पा वय-६० वर्षे २) श्रीमती. फरीदा मुलानी वय-३२ वर्षे, दोघेही रा.ठी. गल्ली नं ०३, संतोषनगर, झोपडपटटी दौलतनगर, बोरीवली पूर्व मुंबई या नवजीवन एस आर ए बिल्डींग, एस व्ही रोड, दहिसर मार्केट, दहिसर पु. मुंबई येथे असल्याबाबत माहिती मिळाल्याने नमुद पोलीस पथकाने सदर इमारतीची तपासणी केली असता नमुद इमारतीच्या सातव्या माळयावर एका रुममध्ये त्या मिळुन आल्याने त्यांचेकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांना ताब्यात घेवुन पुढील तपास कामी पोलीस ठाणेस आणले. सदर वेळी नमुद आरोपी कडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता आरोपीतांनी वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे नमुद गुन्हयांत कलम २९ एन डी पी एस ॲक्ट १९८५ अन्वये वाढ करण्यात आली आहे.

सदर महिला आरोपी ०१) श्रीमती. रेहाना अब्दुल हमीद मुलानी उर्फ रॅलीअप्पा वय-६० वर्षे यांचे विरोधात अंमली पदार्थ विक्री करणे-०४ गुन्हे, शरीराविरोधी अपराध-०५ गुन्हे, लोकसेवकास मारहाण-०२ गुन्हे, दंगली घडवणे-०३, मालमत्तेविरुध्द-०३ गुन्हे असे एकुण १७ गुन्हे दाखल आहेत.

सदर गुन्हयातील दोन्ही महिला या सासु-सुना असुन त्या गेल्या काही दिवसांपासुन स्वत:चे अस्तित्व लवपून वास्तव्याची ठिकाणे वारंवार बदली करुन तपासी यंत्रणेस सतत गुंगारा देत होते. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई श्री. शशिकुमार मिना, पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ ०३, मुंबई श्री. गजानन शिवलिंग राजमाने, आणि सहाय्यक पोलीस आयुक्त, दहिसर विभाग, श्री. जयराज रणवरे, यांच्या मार्गदर्शनाखाली कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्याचे नमुद पथकाने सदरची कामगिरी अत्यंत कौशल्यपुर्ण पार पाडली आहे.

.....